महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | मंगळवार , दि. २४ मार्च २०२६ | वर्ष २ रे | अंक १३२ किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

१७९३ : कागदी चलनाचे जनक समजले जाणारे थॉमस रुझवेल्ट यांचा जन्म.

१९७७ : मोरारजी देसाई यांचा भारताचे पंतप्रधान म्हणून शपथविधी झाला व काँग्रेसची ३० वर्षांची सत्ता संपुष्टात आली.

१९२४ : ज्ञानपीठ विजेते विरेंद्रकुमार भट्टाचार्य यांचा जन्म.

सेन्सेक्स ७४,५३२.९६ +३२५.७२ (०.४४%)
डॉलर ₹ ९४.०१

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३७ | १८ |
| दिल्ली | ३० | १८ |
| मुंबई | ३७ | २४ |
| नागपूर | ३५ | १९ |
| पुणे | ३८ | १६ |

**सुविचार**

विश्वास हा अदृश्य पूल आहे जो अस्तित्वातून स्वप्नांच्या पूर्तीपर्यंतचा प्रवास सोप्पा करतो..

सूर्योदय - सूर्यास्त
स.-६:२९ संध्या-६:४०

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,५१,६९५/- २,४५,०००/-

# भारतीय सुरक्षा यंत्रणा हाय अलर्टवर

## युद्ध दीर्घकाळ चालणार; सुरक्षा यंत्रणांना २४ तास सतर्कतेचे पंतप्रधान मोदींचे आदेश

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेच्या विशेष सत्रात पश्चिम आशियातील वाढत्या संघर्षावर भाष्य करताना भारतीय सुरक्षा आणि धोरणात्मक भूमिकेवर मोठे विधान केले आहे. पंतप्रधानांनी सभागृहात स्पष्ट केले की, पश्चिम आशियातील परिस्थिती केवळ त्या क्षेत्रापुरती मर्यादित नसून त्याचे पडसाद जागतिक स्तरावर उमटत आहेत. समुद्रापासून जमिनीपर्यंत भारताच्या सीमा आणि व्यापारी मार्ग सुरक्षित ठेवण्यासाठी सुरक्षा यंत्रणांना चोवीस तास सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत.**



पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षावर आधीच भारताने गंभीर चिंता व्यक्त केली आहे. पश्चिम आशियातील सर्व देशातील संबंधित नेत्यांशी मी चर्चा केली आहे. मी स्वतः हा तणाव कमी करून थांबवण्याचा आग्रह केला आहे. भारताने भारतीय नागरीक, ऊर्जा आणि वाहतुकीशी संबंधित हल्ल्यांचा विरोध केला आहे. व्यावसायिक जहाजांवरील हल्ला आणि होर्मुझ सामुद्रधुनीसारख्या आंतरराष्ट्रीय जलमार्गावरील बंदी अस्वीकार्य आहे. भारत डिप्लोमसीप्रमाणे युद्धाच्या परिस्थितीतही जहाजांच्या हालचालींकरता निरंतर प्रयत्न करत आहे. भारत प्रत्येकवेळी मानवतेच्या हिताकरता आणि शांतीच्या बाजूने आवाज उठवत राहिला आहे. संवाद आणि कुटनीतीतच या समस्येचं समाधान आहे. आमचा प्रत्येक प्रयत्न तणाव कमी करून संघर्ष संपवण्यासाठी आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी लोकसभेत म्हणाले. या युद्धात कोणत्याही जीवनावरील संकट मानवतेच्या हिताचे नाही. त्यामुळे भारताचा प्रयत्न सर्व पक्षांना लवकरात लवकर शांतीपूर्व समाधानाकरता प्रोत्साहित करत आहे. असे संकट येतात तेव्हा काही तत्त्वे याचा गैरफायदा उचलण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे सुरक्षा यंत्रणांना हायअलर्टवर ठेवण्यात आले आहे. सागरी सुरक्षा, सीमा सुरक्षा, सायबर सुरक्षा मजबूत केल्या जात आहेत, अशी माहिती मोदींनी दिली.

**● मध्य-पूर्व आता अशा वळणावर उभी आहे, जिथे एक चुकीचे पाऊल संपूर्ण प्रदेशाला ऊर्जा आणि मानवतावादी संकटात टाकू शकते. येत्या काही तासांत मुत्सद्देगिरीची संधी मिळेल की एका नव्या, वेगवान युद्धाला सुरुवात होईल, याकडे आता जगाचे लक्ष लागले आहे. त्यामुळे आपण या संकटाचा सामना करण्यासाठी एकजूट होऊन या संकटावर मात कशी करता येईल, यावर आपले लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. यासाठी आपली संपूर्ण यंत्रणा अलर्ट मोड वर २४ तास सतर्क राहणे गरजेचे असल्याचे पंतप्रधान मोदी म्हणाले.**

### ➢ कोरोनाप्रमाणे आताही एकजूट राहावं लागेल

**या युद्धामुळे जगातील कठीण परिस्थिती दीर्घकाळ राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे आपल्याला तयार राहावं लागेल आणि एकजूट राहावं लागेल. आपण केरोनाच्या वेळीही एकजुट राहून काम केलं. आताही त्याचप्रमाणे तयार राहण्याची गरज आहे. संयम, धैर्याने, शांत मनाने सामना करायचा आहे. हीच आपली ओळख आहे, असंही खास आवाहन नरेंद्र मोदी यांनी केलं.**

## थोडक्यात



### मिनीबसच्या भीषण अपघातात चार जण ठार

**अमरावती ।** जिंतूर-जालना महामार्गावर रविवारी दुपारी १.३० वाजेच्या सुमारास स्विफ्ट डिझायर कार व मिनीबसचा समोरासमोर भीषण अपघात झाला. या अपघातात एकाच कुटुंबातील चौघेजण जागीच ठार झाले. तर दोन्ही वाहनामधील एकूण आठ जण जखमी झाले. हिंगोली जिल्ह्यातील वसमत येथील सय्यद आबेदअली सय्यद महेबुबअली हे आपल्या कुटुंबियांसह ईदनिमित्त बहिणीला भेटण्यासाठी कारमधून मंठा जि. जालना येथे जात होते.

### तापमान वाढीचे संकट अल निनो सक्रिय होणार?

**पुणे ।** जागतिक पातळीवर हवामानात झपाट्याने बदल होत आहे. याचा परिणाम दैनंदिन जीवनात बदलाच्या परिणामांना सामोरे जावे लागत आहे. सध्या पृथ्वीच्या हवामानाचे संतुलन बिघडले आहे. आतापर्यंत इतिहासात अशा प्रकारच्या असंतुलित हवामानाची नोंद झाली नाही यामुळे ही धोक्याची घंटा असल्याचा इशारा_दिला आहे.

# पुणे–गाझीपूर सिटी विशेष रेल्वेला जळगाव स्थानकावर मिळाला थांबा

प्रतिनिधी। जळगाव

**वाढत्या उन्हाळी गर्दीचा विचार करून मध्य रेल्वे प्रशासनाने पुणे विभागातून उत्तर महत्त्वाच्या शहरांकडे विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला. त्याअंतर्गत पुणे ते गाझीपूर सिटी धावणाऱ्या द्विसाप्ताहिक विशेष गाडीला जळगाव रेल्वे स्थानकावर अधिकृत थांबा देण्यात आला आहे.**



यामुळे जिल्ह्यासह परिसरातील प्रवाशांना फायदा होणार असून, पुणे जाण्यासाठी सोयीस्कर पर्याय उपलब्ध झाला आहे. उन्हाळी सुट्ट्यांच्या काळात रेल्वे प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गर्दी वाढते. यामुळे जळगावला थांबा देण्यात आला आहे.

# शिंदे गटाचे सर्व मंत्री राजीनामा देणार?

## महायुतीतून बाहेर पडण्याचे दिले संकेत

प्रतिनिधी । सातारा

**सातारा जिल्हा परिषद निवडणुकीनंतर महायुतीतील अंतर्गत वाद आता टोकाला पोहोचला असून संतप्त झालेल्या शिंदेसेनेच्या मंत्र्यांनी थेट राजीनाम्याची धमकी दिल्याची माहिती समोर येत आहे.**

साताऱ्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई आणि इतर शिवसेना मंत्र्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन आपली तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.सातारा जिल्हा परिषद निवडणुकीवरून योग्य कारवाई झाली नाही तर आम्ही राजीनामा देऊ, अशी भूमिका शिवसेना आमदारांनी

(पान २ वर)

### ➢ गळचेपी थांबवा



सातत्याने आमची गळचेपी होत आहे यावर बोलले पाहिजे, अशी मागणी देखील शिवसेना आमदारांनी केल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. शिवसेना मंत्र्यांची नाराजी पाहून उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका घेतल्याची माहिती मिळत आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असताना साताऱ्यातील या प्रकरणावरून आक्रमक भूमिका घेण्याचे आदेश एकनाथ शिंदेंनी आपल्या मंत्री आणि आमदारांना दिल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. त्यामुळे महायुतीत हे शीत युध्द सुरू झाल्याचे संकेत आहेत.

# हर्षवर्धन सदगीर ठरला महाराष्ट्र केसरी

## मानाच्या चांदीच्या गदेसह झाला मालामाल



वृत्तसंस्था । पुणे

पुण्यातील वाघोली येथे ६८व्या महाराष्ट्र केसरीचा अंतिम सामना खेळवला गेला. स्पर्धेचा अंतिम सामना हर्षवर्धन सदगीर आणि बाहुबली ओळख मिळवलेल्या महेंद्र गायकवाड यांच्यात खेळवण्यात आला. हर्षवर्धन सदगीरने महेंद्र गायकवाडवर ३ गुणांनी विजय मिळवला. या विजयासह नाशिकचा कुस्तीपटू हर्षवर्धन सदगीर दुसऱ्यांदा विजेता ठरला. यासह डबल महाराष्ट्र केसरी होण्याचा बहुमानही त्याने मिळवला आहे.

चुरशीच्या अंतिम लढतीत नाशिकच्या हर्षवर्धन सदगीर याने महेंद्र गायकवाडचा ४-३ अशा फरकाने पराभव केला. पुण्यातील या प्रतिष्ठेच्या लढतीकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागून होतं. सोलापूरचा महेंद्र गायकवाड म्हणजे आक्रमक

(पान २ वर)

रामकृष्ण अण्णा सातव पाटील यांच्या आयोजनाखाली पार पडलेल्या या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत विजेत्या हर्षवर्धन सदगीरला मानाची चांदीची गदा, ५ लाख रुपयांचे रोख पारितोषिक आणि फॉर्च्युनर गाडी देण्यात आली आहे.

तर उपविजेत्या महेंद्र गायकवाडला स्कॉर्पिओ आणि चार लाखांचे रोख पारितोषिक देण्यात आलं आहे. महाराष्ट्र केसरीमध्ये गादी विभागात हर्षवर्धन सदगीर याने जय पाटीलचा पराभव करत अंतिम फेरी गाठली होती. तर माती विभागात महेंद्र गायकवाड आणि सिकंदर शेख या दोन तगड्या पैलवानांमध्ये लढत झाली आणि महेंद्रने सिकंदरला धोबीपछाड देत अंतिम फेरी गाठली होती.

## ‘त्या’ खेळाडूंना संघातून काढा

वृत्तसंस्था । मुंबई

आयपीएल २०२६ चा हंगाम सुरू होण्यापूर्वी परदेशी खेळाडूंच्या नखऱ्यांमुळे भारतीय क्रिकेट वर्तुळात नवा वाद पेटला आहे. अनेक दिग्गज ऑस्ट्रेलियन आणि न्यूझीलंडच्या खेळाडूंनी अचानक माघार घेतल्याने किंवा उपलब्धतेबाबत अनिश्चितता दर्शवल्याने सुनील गावस्कर संतापले असून त्यांनी विदेशी खेळाडूंवर कडक शब्दांत ताशेरे ओढले आहेत. त्या खेळाडूंना बाहेरचा रस्ता दाखवा, असे फ्रँचायजीं संघ मालकांना ठणकावले आहे.

# इराणवर पुढील ५ दिवस हल्ले नाही करणार..!

## अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची घोषणा

वृत्तसंस्था । वॉशिंग्टन



**मध्य पूर्वेत गेल्या तीन आठवड्यांपासून सुरु असलेल्या युद्धानं संपूर्ण जग संकटात सापडलं आहे. इराण विरुद्ध इस्रायल-अमेरिका संघर्ष टोकाला गेलेला असताना आता अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी महत्त्वाची घोषणा केली आहे. इराणच्या ऊर्जा संसाधनांवर आणि प्रकल्पांवरील हल्ले ५ दिवसांसाठी थांबवत असल्याची घोषणा ट्रम्प यांनी केली.**

गेल्या दोन दिवसांत अमेरिका आणि इराण यांच्यात चर्चा झाली. ही चर्चा सकारात्मक होती. त्या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांनी केलेली घोषणा महत्त्वाची मानली जात आहे. दोन्ही देशांमध्ये मध्य पूर्वेतील तणाव कमी करण्यासंदर्भात तणाव पूर्णपणे संपवण्यासाठी गंभीर चर्चा सुरु असल्याचा दावा ट्रम्प यांनी केला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर ट्रूथ सोशलवर युद्धासंदर्भात पोस्ट केली आहे. इराणसोबत गेल्या दोन दिवसांपासून अतिशय सकारात्मक चर्चा सुरु आहे. मध्य पूर्वेत सुरु असलेला संघर्ष पूर्णपणे संपवण्याच्या दृष्टीनं चर्चा झाली आहे. दोन्ही देशांत सुरु असलेली गहन आणि सविस्तर चर्चा, त्यातील

(पान २ वर)

# शाळांमध्ये आता मुलींसाठी ‘पिंक रूम’

## शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांचे महत्त्वपूर्ण सूतोवाच

वृत्तसंस्था ।पुणे

**स्वसंरक्षण हे केवळ शारीरिक प्रशिक्षण नसून ते विद्यार्थिनींच्या आयुष्यातील एक महत्त्वाची शिस्त आहे. प्रत्येक मुलीने स्वतःच्या पायावर उभे राहून स्वतःचे रक्षण करण्यास सक्षम झाले पाहिजे, असा संदेश शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विद्यार्थिनींना दिला. विद्यार्थिनींच्या आरोग्यासाठी आणि सुरक्षिततेसाठी ‘पिंक रूम’ ही नवी संकल्पना प्रत्येक शाळेत राबवण्याचे सूतोवाचही त्यांनी केले.**



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणे जिल्हा परिषद यांच्यातर्फे स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित झराणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा अभियानाच्या उद्घाटन कार्यक्रमात भुसे बोलत होते. या कार्यक्रमाला पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, आमदार हेमंत रासने, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक डॉ. हेमंत वसेकर, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक महेश पालकर,

प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, योजना विभागाचे संचालक कृष्णकुमार पाटील, शिक्षण उपसंचालक डॉ. गणपत मोरे, महापालिकेच्या प्रशासन अधिकारी सुनंदा वाखारे, जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य विकास गरड वेळी उपस्थित होते.


(पान २ वर)

### मुली आत्मनिर्भर होतील

२६ जानेवारी रोजी एकाच वेळी २ कोटींपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गाण्यांवर कवायत करून एक नवा विक्रम प्रस्थापित केला. ही अभिमानास्पद बाब आहे. आगामी काळात सैनिकी प्रशिक्षणातून ‘राष्ट्र प्रथम आणि देश सर्वोच्च’ ही भावना विद्यार्थ्यांच्या मनामनात रुजवली जाणार आहे. केवळ पुस्तकी ज्ञानावर भर न देता गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच कला, क्रीडा आणि स्वसंरक्षणाला प्राधान्य दिले पाहिजे. प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण मिळणे ही काळाची गरज आहे. या अभियानामुळे महाराष्ट्रातील विद्यार्थिनी खऱ्या अर्थाने ‘निर्भय’ आणि ‘आत्मनिर्भर’ होतील, असेही भुसे यांनी नमूद केले.

# अशोक खरातला पाठिशी घालणारे तीन अधिकारी कोण? विरोधकांचा आरोप

वृत्तसंस्था । नाशिक



**‘पूर्ण राज्यात गाजत असलेल्या नाशिक येथील भोंदूबाबा अशोक खरात याच्या काळ्या कर्तृत्वाचे पडसाद आज विधानसभेतही उमटले. महाविकास आघाडीच्या तीन आमदारांनी या प्रकरणातील धक्कादायक माहिती सभागृहात मांडली. काँग्रेसचे ब्रम्हपुरीचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी या प्रकरणात तीन बड्या सनदी अधिकाऱ्यांचे लागेबांधे असल्याचा आरोप केला.**

तर आमदार नाना पटोले यांनी या विषयावर विधानसभेत विशेष चर्चा घडवून आणण्याची मागणी केली. त्याशिवाय ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव यांनीही पुरोगामी महाराष्ट्राचे उदाहरण देत सत्ताधाऱ्यांना जाब विचारण्याचा प्रयत्न केला. विरोधकांच्या या आक्रमकतेला मुख्यमंत्री

(पान २ वर)

## संपादकीय

### भोंदू राजकारण रडारवर!

अध्यात्मिक मार्गदर्शनाच्या नावाखाली महिलांचा लैंगिक छळ करणारा भोंदू बाबा अशोक खरात याला पोलिसांनी अटक केल्यानंतर महाराष्ट्रात जोरदार चर्चा सुरू झाली आहे. या विषयाला राजकीय वलय असल्यामुळे मूळ विषय बाजूला पडून यामधील राजकारण समोर आणण्याचा प्रयत्नही या निमित्ताने समोर येताना दिसत आहे. गेल्या कित्येक वर्षांच्या कालावधीमध्ये सातत्याने भाषणे गाजवताना व्यासपीठावर महाराष्ट्राला पुरोगामी हे विशेषण दिले जात असले, तरी हे केवळ व्यासपीठ गाजवण्यासाठीच दिले जाते की काय, अशी शंका यावी अशा घटना महाराष्ट्रात सातत्याने घडत आहेत. ज्या महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पुढाकाराने आणि नरेंद्र दाभोळकर यांच्या आग्रहामुळे बुवाबाजी अंधश्रद्धा विरोधी कायदा झाला, त्याच महाराष्ट्रात अनेक ठिकाणी आणि सतत बुवा बाबा यांचे फॅड वाढलेले दिसते. अशोक खरात या तथाकथित अध्यात्मिक गुरू आणि भोंदू बाबाच्या ज्या लीला सध्या उघडकीस येत आहेत, त्या पाहता या अध्यात्मिक मार्गदर्शनाच्या नावाखाली महिलांचा लैंगिक छळ केला जात होता हे सहज लक्षात येते. अनेक बाबा आणि बुवा सर्वसामान्यांची आर्थिक पिळवणूकही करत असतात. आपली संपूर्ण मालमत्ता एखाद्या बाबा किंवा बुवाच्या नावावर करून देणारे भक्तही आढळतात. याच मालिकेतील हा अशोक खरात हा भोंदू बाबा असला तरी या प्रकरणाला राजकीय वलय असल्यामुळे हा विषय आणखी काही काळ तरी पेटता राहील, असे दिसते. महाराष्ट्र असो किंवा देशातील इतर राज्य असोत राजकारणी लोक धार्मिकतेचा वापर राजकारणासाठी करतात. ज्या प्रकारे निवडणुकीपूर्वी किंवा निवडणुकीनंतरसुद्धा आपल्या धार्मिक श्रद्धा असलेल्या ठिकाणी नतमस्तक होण्याचे काम राजकीय नेत्यांकडून केले जाते, ते पाहता राजकीय नेत्यांनी एखाद्या बाबाचे किंवा बुवाचे भक्त होणे ही काही वेगळी गोष्ट मानता येत नाही. राजकारणात असुरक्षिततेचे प्रमाण जास्त असल्यामुळे राजकीय नेत्यांना कोणत्या ना कोणत्या बाबा बुवाचा आशीर्वाद हवाच असतो आणि जेव्हा अशोक खरातसारखा एखादा बाबा समोर येतो तेव्हा हे नेते कोणताही विचार न करता अशा भोंदू बाबांसमोर नतमस्तक होतात. अशा अनेक घटना आजपर्यंत घडल्या आहेत. अशोक खरातच्या या घटनेमध्ये महाराष्ट्राच्या महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांचा सहभाग आढळल्याने त्यांना महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला. आणखीही काही नेते सध्या रडारवर आहेत. खूप वर्षांपूर्वी महाराष्ट्राच्या एका माजी मुख्यमंत्र्यांच्या अधिकृत निवासस्थानी एका वादग्रस्त महाराजांची पाद्यपूजा झाली होती तो विषयही त्याकाळी मोठा गाजला होता. भारतीय संविधानाने सर्वांना आपल्या धार्मिक श्रद्धा जपण्याचे स्वातंत्र्य दिले असले, तरी सामाजिक आणि राजकीय चेहरा म्हणून वावरत असताना आपण या धार्मिक श्रद्धेमध्ये किती वाहवत जायचे याचा विचार राजकीय नेत्यांना करावा लागतो. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपण ज्या बाबा किंवा बुवाच्या नादी लागलो आहोत तो भोंदू आहे का खरोखरच अध्यात्मिक मार्गदर्शन करणारा गुरू आहे यातील फरकही स्पष्ट करता आला पाहिजे. महाराष्ट्रातच नाही तर देशातही अनेक ठिकाणी गेल्या काही वर्षांमध्ये बाबा आणि बुवांचे फॅड वाढत चालले आहे. तो एक समृद्ध व्यवसाय बनत चालला आहे. आधुनिक काळातील असुरक्षितेची भावना आणि स्पर्धात्मक वातावरण यामुळे तरुणाईपासून वृद्धांपर्यंत सर्वांनाच कोणत्या ना कोणत्या अध्यात्मिक गुरूच्या आशीर्वादाची गरज वाटू लागली आहे. भोंदू बाबा आणि बुवांना यामध्येच मोठी बाजारपेठ दिसत असल्यामुळे थोडे ज्योतिषविषयक ज्ञान, थोडेफार बोलण्याची क्षमता आणि मार्केटिंगचे ज्ञान या बळाबर अनेक भोंदू अध्यात्मिक महाराज म्हणून उदयाला येऊ लागले आहेत.

# उमापती मंदिराची जागा नियमानुकुलानंतर विकास कामे करू : आ. चंद्रकांत रघुवंशी

प्रतिनिधी । नंदुरबार

**शहरातील श्रद्धास्थान असलेल्या प्राचीन उमापती महादेव मंदिर परिसरातील साडेचार एकर शासकीय जागेवरील अतिक्रमण नियमानुकूल करण्याच्या मागणीला राज्य शासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. शिवसेना संपर्कप्रमुख आ. चंद्रकांत रघुवंशी यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केलेल्या पाठपुराव्यामुळे या जागेचा प्रश्न मार्गी लागण्याचे संकेत मिळाले आहेत.**



या महत्त्वपूर्ण यशाबद्दल रविवारी मंदिर ट्रस्टच्यावतीने आ. चंद्रकांत रघुवंशी यांचा सत्कार करण्यात आला. जागा नियमानुकूल होताच या ठिकाणी भाविकांसाठी सोई सुविधासाठी उपलब्ध करून देऊन विकास कामे केली जातील, असे आश्वासन आ. रघुवंशी यांनी दिले. गेल्या आठवड्यात मुंबई येथे महसूल मंत्र्यांच्या दालनात यासंदर्भात विशेष बैठक पार पडली. यावेळी आ. चंद्रकांत रघुवंशी यांनी उमापती महादेव मंदिराचे ऐतिहासिक आणि धार्मिक महत्त्व मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. हे मंदिर शेकडो वर्षांपासून नंदुरबारकरांचे श्रद्धास्थान आहे. श्रावण मास आणि दसऱ्याच्या सीमोल्लंघनासाठी येथे भाविकांची मोठी गर्दी असते. मंदिराच्या ताब्यातील एकर जागा शासकीय असल्याने तिथे विकासकामे करण्यास अडचणी येत आहेत. ही जागा मंदिराच्या नावे नियमानुकूल करणे आवश्यक आहे, अशी आग्रही मागणी त्यांनी केली. यावर महसूल मंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत कार्यवाहीचे आश्वासन दिले.

**ट्रस्टकडून आ.रघुवंशींचा सत्कार**

शासकीय स्तरावर या विषयाचा यशस्वी पाठपुरावा केल्याबद्दल रविवारी उमापती महादेव मंदिर ट्रस्ट आणि भक्तांच्या वतीने आ. चंद्रकांत रघुवंशी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मंदिर ट्रस्टचे पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने शिवभक्त उपस्थित होते.

**मंदिराचा कायापालट होणार**

मंदिराची जागा अधिकृतरीत्या नियमानुकूल झाल्यानंतर या ठिकाणी भाविकांसाठी भव्य भक्तनिवास, पिण्याचे पाणी आणि इतर सोयी-सुविधा निर्माण केल्या जातील. जागेच्या तांत्रिक अडचणीमुळे रखडलेला मंदिराचा कायापालट आता लवकरच सुरू होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. शहरातील प्राचीन उमापती महादेव मंदिराचा प्रश्न शासन दरबारी मांडण्याची संधी मिळाली, हे मी माझे भाग्य समजतो. जागा नियमानुकूल होताच या ठिकाणी भाविकांच्या सोयीसाठी मोठ्या प्रमाणावर विकासकामे केली जातील,असे शिवसेना संपर्कप्रमुख तथा आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी सांगितले.

# नवापूरला ३१ ग्रामपंचायतींसाठी पाणी टँकरचे झाले वितरण

● आमदार शिरीषकुमार नाईक यांचा पुढाकार



प्रतिनिधी । नवापूर

**तालुक्यातील नागरिकांना उन्हाळयात भेडसावणाऱ्या पाणीटंचाईच्या समस्येवर मात करण्यासाठी जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाच्या नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत ३१ ग्रामपंचायतींना पाणी टँकरचे वितरण करण्यात आले.**

नवापूर विधानसभा क्षेत्राचे आमदार शिरीषकुमार नाईक यांच्या विशेष प्रयत्नातून हा उपक्रम राबविण्यात आला. दि.१६ मार्च रोजी नवापूर येथील सिनिअर कॉलेजमध्ये २० ग्रामपंचायतींना टँकरचे वाटप करण्यात आले. त्यानंतर दि. १७ मार्च रोजी खांडबारा परिसरातील सोनपाडा, श्रावणी, घोगलपाडा, पेठे कडवान, मोगराणी, पिंपळे, करंजाळी, भादवड व बिजगाव या ग्रामपंचायतींना आ.नाईक यांच्याहस्ते टँकर वितरित करण्यात आले. या उपक्रमामुळे तालुक्यातील अनेक गावांना मोठा दिलासा मिळणार असून ग्रामीण भागातील पाणीप्रश्न सोडविण्यासाठी प्रशासन व लोकप्रतिनिधी यांची सकारात्मक भूमिका अधोरेखित झाली आहे. उन्हाळयाच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा सुरळीत राहावा यासाठी आमदार नाईक यांनी सातत्याने पाठपुरावा करून ही योजना तालुक्यात राबवून घेतली. या कार्यक्रमास माजी पंचायत समिती सदस्य छगन महाले, दिलीप पवार, खांडबारा गावाचे प्रभारी सरपंच योगेश भगवान चौधरी, ग्राम पंचायत सदस्य वरून गावित, जगन कोकणी, मनीष गावित, संदीप गावित, गणेश गावित, मनोज गावित, दिलवर कोकणी, काशीराम शेठ व पदाधिकारी उपस्थित होते.

# डॉ. आंबेडकर जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी दिनेश वळवी

प्रतिनिधी । नंदुरबार

**विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी दिनेश वळवी, उपाध्यक्षपदी विकास कोळी तर सचिवपदी ललित कोळी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.**



डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवानिमित्त नंदुरबार येथील जेतवन बुद्ध विहार येथे विशाल फाऊंडेशनतर्फे बैठकीचे आयोजन केले होते. यावेळी अध्यक्षस्थानी फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष विशाल ढोढरे हे होते. यावेळी जयंतीनिमित्त रूपरेषा आखण्यात आली.तसेच पुढील कार्यकारिणीत उपाध्यक्ष प्रशांत बैसाणे, खजिनदार गणेश पाडवी, कार्याध्यक्षपदी मुकेश ठाकरे यांची निवड करण्यात आली. यावेळी दिपक ठाकरे, सचिन ठाकरे, शकुंतला ठाकरे, रोहिणी कल्हारे, वनराजा वळवी, सुनील सुर्यवंशी, बुधा पवार, मोहन माळी, बबलू माळी उपस्थित होते. उत्सवासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन वळवी यांनी केले.

# सगळीच अतिक्रमणे काढून शहराचा श्वास मोकळा करा

## शहाद्यातील अतिक्रमण हटावसाठी माजी नगरसेवक संदीप पाटील उतरले मैदानात

प्रतिनिधी । शहादा

**ठराविक नको, सगळीच अतिक्रमणे काढून शहराचा श्वास मोकळा करा, अशी मागणी करीत शहाद्यातील अतिक्रमण हटावसाठी आता माजी नगरसेवक संदीप पाटील हे देखील मैदानात उतरले आहे.**



शहादा नगरपरिषद हद्दीतील अतिक्रमणांच्या मुद्याचा धुरळा खाली बसायला तयार नसून, आता माजी नगरसेवक संदीप पाटील यांनीही या विषयात उडी घेतली आहे. शहरात अतिक्रमण हटाव मोहीम राबविणार असाल तर ही मोहीम केवळ काही अतिक्रमणे हटवण्यापुरती राहू नये. हटवायची तर सगळीच अतिक्रमणे हटवून शहराचा श्वास मोकळा करा, अशी मागणी संदीप पाटील यांनी केली आहे. माजी नगरसेवक संदीप पाटील यांनी शहरातील संभाव्य अतिक्रमण मोहिमेच्या अनुषंगाने नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. गेल्या काही दिवसांपासून शहरातील अतिक्रमण काढण्याबाबत काही लोकप्रतिनिधींकडून पाठपुरावा सुरू असणे. ही बाब स्वागतार्ह आहे. मात्र, ही मोहीम फक्त ठराविक व्यक्ती किंवा व्यावसायिकांपुरती मर्यादित न राहता, सगळीच अतिक्रमणे काढून शहराचा श्वास मोकळा करा, असे त्यांनी निवेदनात म्हटले आहे. शहरातील मुख्य रस्ते, खुल्या जागा तसेच विविध महत्त्वाच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे झाली असून, त्यामध्ये काही धनदांडग्यांचाही समावेश आहे. त्यामुळे अतिक्रमण हटविताना भेदभाव न करता सर्वांवर समान कारवाई करावी. तसेच, बदनामी किंवा वैयक्तिक वैरातून निवडक अतिक्रमणांवरच कारवाई करण्यात आली, तर त्याचे गंभीर सामाजिक परिणाम होऊ शकतात. अशा परिस्थितीत शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असेही निवेदनात नमूद केले आहे. नगरपरिषदेने भविष्यात पारदर्शक, न्याय्य व सर्वसमावेशक पद्धतीने अतिक्रमण हटाव मोहीम न राबविल्यास शहरवासीयांमध्ये तीव्र रोष निर्माण होऊन आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

## पान १ वरुन

**अशोक खरातला पाठिशी .....**

देवेंद्र फडणवीस यांनी शांतपणे उत्तर दिले.

विजय वडेट्टीवार नेमके काय म्हणाले?आमदार विजय वडेट्टीवार यांनी भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणी धक्कादायक माहिती सभागृहासमोर ठेवली. पुरोगामी महाराष्ट्रात धर्माच्या नावाखाली महिलांचे शोषण करणाऱ्या अशोक खरातसारख्या भोंदू बाबांना अभय मिळणे, ही अत्यंत शरमेची बाब आहे. ज्योतिषशास्त्राच्या नावाखाली लोकांची दिशाभूल करणाऱ्या या भोंदूचे १०० हून अधिक आक्षेपार्ह व्हिडिओ समोर आले आहेत. या विकृत प्रवृत्तीमुळे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक परंपरेला तडा जात असून, हे खपवून घेतले जाणार नाही.सर्वात धक्कादायक म्हणजे या भोंदू बाबाला अटक होऊ नये म्हणून शासनाचे उच्चपदस्थ आयएएस-आयपीएस आणि महसूल अधिकारी एका हॉटेलमध्ये बैठका घेत होते. जे अधिकारी आणि मंत्री संविधानाची शपथ घेतात, तेच जर अशा भोंदूंच्या पाया पडत असतील, तर सामान्य जनतेने न्याय कोणाकडे मागायचा? केवळ एसआयटीकडे तपास देऊन हे प्रकरण शांत होणार नाही, यात सामील असलेल्या प्रत्येक मंत्र्याचा राजीनामा आणि दोषी अधिकाऱ्यांचे निलंबन झालेच पाहिजे, असे वडेट्टीवार म्हणाले.

**शाळांमध्ये आता.....**

ग्रँडमास्टर शिफुजी शौर्य भारद्वाज आणि त्यांच्या चमूने पुण्यातील ४७६ शाळांमधील सुमारे १२ हजार विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे धडे दिले.भुसे म्हणाले, प्रत्येकाने शाळेतील प्रत्येक विद्यार्थिनीपर्यंत हे प्रशिक्षण पोहोचवण्याचा संकल्प व्यक्त केला पाहिजे. एखादी मुलगी स्वतःचे रक्षण करण्यास सक्षम होते, तेव्हा तिचे मनोबल उंचावते आणि तिच्या संपूर्ण जीवनात एक शिस्त निर्माण होते. हीच शिस्त देशाला बलशाली बनवण्यासाठी महत्त्वाची ठरणार आहे.

**शिंदे गटाचे सर्व मंत्री......**

एकनाथ शिंदे यांच्यासमोर मांडली. सातत्याने आमची गळचेपी होत आहे यावर बोलले पाहिजे, अशी मागणी देखील शिवसेना आमदारांनी केल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

शिवसेना मंत्र्यांची नाराजी पाहून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका घेतल्याची माहिती मिळत आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असताना साताऱ्यातील या प्रकरणावरून आक्रमक भूमिका घेण्याचे आदेश शिंदेंनी आपल्या मंत्री आणि आमदारांना दिल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

**हर्षवर्धन सदगीर ठरला......**

अंदाजात खेळ करणं आणि हर्षवर्धनने मात्र या लढतीत आक्रमक आणि संयम खेळ यांचा अचूक मेळ साधला. यासह तो महेंद्र गायकवाडला टक्कर देत मानाची चांदीची गदा पटकावण्यात यशस्वी ठरला. हर्षवर्धन हा महाराष्ट्राचा सातवा डबल केसरी ठरला.

सहा मिनिटांच्या दोन फेऱ्या खेळवल्या गेल्या. त्यामधील पहिल्या फेरीत दोघांनी एक एक गुण घेतला होता. पहिल्या फेरीतच गुणांची बरोबरी झाली होती. दुसऱ्या फेरीत दोघेही आक्रमक झाले होते. दोन्ही पैलवानांना इशारा दिला गेला. यानंतर शेवटच्या दीड मिनिटांमध्ये तीन गुण मिळवत सदगीरने आघाडी मिळवली. गायकवाडनेही अखेरील तीन गुण मिळवले पण वेळ संपल्याने हर्षवर्धनने निसटता विजय मिळवला.

**इराणवर पुढील ५ दिवस.....**

सकारात्मक घडामोडी पाहता आठवडाभर चालेल. त्यामुळे इराणवरील ऊर्जा केंद्र, ऊर्जा प्रकल्प यांच्यावर सुरु असलेले हल्ले पुढील ५ दिवसांसाठी टाळण्याचे आदेश अमेरिकेच्या संरक्षण विभागाला दिले आहेत, अशी माहिती ट्रम्प यांनी दिली.

# पटेल विद्यालयाच्या तीन विद्यार्थ्यांची निवड

प्रतिनिधी । शिरपूर

तालुक्यातील खंबाळे येथील आर. सी. पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या तीन विद्यार्थ्यांनी सन २०२५-२६ च्या जवाहर नवोदय विद्यालय निवड चाचणी परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. त्यात विपल्व मणिलाल पावरा याने ९३.७५ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. अवनी विनोद पावरा हिने ८२.५० टक्के, अरुण चिंतामण पावरा याने ८० टक्के गुण मिळवून परीक्षेत यश मिळवले. यासाठी वर्गशिक्षक वाय.पी.पाटील, डी.बी.राजपूत,के.बी. शिरसाळे यांचे मार्गदर्शन लाभले.

# कमर्शियल गॅस टंचाईने पिंपळनेरमधील हॉटेल व्यवसाय ठप्प

प्रतिनिधी । पिंपळनेर

**शहरात कमर्शियल गॅस सिलेंडरचा तुटवडा निर्माण झाल्याने हॉटेल व्यवसायिकांवर मोठे संकट ओढवले असून अनेकांच्या व्यवसायावर थेट परिणाम होत आहे. परिणामी अनेक ठिकाणी हॉटेल्स बंद ठेवण्याची वेळ येत असून रोजीरोटीचा प्रश्न गंभीर बनला आहे.**






पिंपळनेर शहरातील चहा, नाश्ता, चायनीज तसेच लहान-मोठ्या हॉटेल व्यवसायिकांना कमर्शियल गॅस वेळेवर मिळत नसल्याने अडचणी वाढल्या आहेत. घरगुती गॅस २१ दिवसांनी मिळत असला तरी व्यवसायासाठी दर एक दोन दिवसांत गॅस आवश्यक असल्याने व्यवसाय चालवणे कठीण झाले आहे. गॅस उपलब्ध नसल्यास कुटुंबासह कामगारांच्या उदरनिर्वाहावरही परिणाम होत असल्याची व्यथा हॉटेल व्यावसायिकांनी मांडली आहे.

पर्याय नसल्याने काहींनी दगडी चुलीचा आधार घेत लाकडांवर व्यवसाय सुरू ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, यामुळे खर्च, वेळ आणि श्रम वाढत असल्याने तोही तात्पुरता उपाय ठरत आहे. अलीकडील आंतरराष्ट्रीय युध्दजन्य परिस्थितीची झळ पिंपळनेर शहरातील ग्रामीण भागापर्यंत पोहोचत असल्याचे चित्र दिसत आहे. दरम्यान, रोशननगर परिसरात ईद मिलन कार्यक्रमासाठी शीरखुर्मा तयार करतानाही गॅसअभावी चुलीवर दूध उकळावे लागले. शासनाने कमर्शियल गॅस सिलेंडर तातडीने उपलब्ध करून द्यावेत, अन्यथा हॉटेल व्यवसाय पूर्णपणे ठप्प होण्याची भीती व्यक्त होत आहे.

# आई एकवीरा देवीच्या चैत्र यात्रोत्सवासाठी प्रशासनाची जय्यत तयारी

प्रतिनिधी । धुळे

**कुलस्वामिनी आई एकवीरा देवीच्या चैत्र यात्रोत्सवासाठी प्रशासन व मंदिर व्यवस्थापनाने जय्यत तयारी सुरू केली असून पांझरा नदी परिसरात उत्सवी हालचालींना वेग आला आहे. दि. १ ते १६ एप्रिलदरम्यान होणाऱ्या यात्रेच्या पार्श्वभूमीवर धार्मिक, सुरक्षा आणि सोयी-सुविधांचे नियोजन अंतिम टप्प्यात पोहोचले आहे.**



दि. १९ ते २६ मार्चदरम्यान मंदिरात अभिषेक, पूजन, नवचंडी महायज्ञ, कुमारीका पूजन आणि पारंपरिक रथोत्सव यांसारख्या धार्मिक कार्यक्रमांची आखणी करण्यात आली आहे. १ एप्रिल रोजी मानमानता, जाऊळ, शेंडी, कुळधर्म आणि अभिषेक पूजांचे आयोजन होणार असल्याने भाविकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. या यात्रेच्या पार्श्वभूमीवर पांझरा नदी परिसरात तयारीला वेग आला आहे. नदीपात्रात स्वच्छता मोहीम राबवून घाण पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

पाळणे, झुले आणि विविध मनोरंजन साधने दाखल झाली असून त्यासह व्यावसायिकांनी तंबू उभारण्यास सुरुवात केली आहे. ही लगबग सुरू झाल्याने परिसरात यात्रेचे वातावरण रंगू लागले आहे. उन्हाच्या तीव्रतेमुळे कामाचे नियोजनही काळजीपूर्वक करण्यात आले आहे. दुपारनंतर काम थांबवून सायंकाळी पुन्हा सुरू केले जाते, तर जनरेटरच्या साहाय्याने रात्री उशिरापर्यंत कामे सुरू ठेवली जात आहेत.

एकीकडे मंदिरासमोर ५१ शक्तिपीठांच्या उभारणीचे काम वेगाने सुरू आहे, तर दुसरीकडे यात्रेतील मनोरंजन साधनांची उभारणी अंतिम टप्प्यात पोहोचत आहे. त्यामुळे संपूर्ण परिसरात धार्मिकतेसोबतच उत्सवी रंग भरू लागले आहेत. दरवर्षीप्रमाणे नवसपूर्तीसाठी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहणार असल्याने मंदिर परिसरात लांबपर्यंत मंडप उभारला जाणार आहे. दरम्यान, यंदा सुमारे ५० सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येणार असून पोलिस बंदोबस्तही तैनात राहणार आहे. तसेच वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी मंदिरापासून सुमारे ४०० मीटर अंतरावर पूल, कुरती स्टेडियम आणि अमरधाम परिसरात पार्किंगची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. भक्ती, परंपरा आणि यात्रेचा संगम अनुभवण्यासाठी खान्देशसह राज्यभरातील भाविकांची पावले पुन्हा एकदा एकवीरा देवीच्या दर्शनासाठी वळणार आहेत.

# अमळनेर येथून मोटारसायकल चोरी

प्रतिनिधी । अमळनेर

शहरातील मुंदडा नगर १ जवळील कस्तुराबाग नगर येथील शांताराम माणका महाजन यांची होंडा शाईन कंपनीची मोटार सायकल चोरी झाल्याची घटना ता. २२ रोजी रात्री सुमारे अडीच वाजता झाली. एम. एच.१९ ए. वाय. ६१६७ क्रमांकाची गाडी आज रात्री अडीच वाजेच्या सुमारास चोरी झाली. ही घटना सी. सी. टी. व्ही मध्ये कैद झाली असून गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत तपास अमळनेर शहर पोलिस करीत आहेत.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
* कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# ५०० रुपयांसाठी तरुणाची धारदार शस्त्राने हत्या

## जळगावमध्ये कायद्याचा धाक संपला; गुन्हेगारीत वाढ

प्रतिनिधी । जळगाव

**अवैध धंद्यांसह किरकोळ कारणावरुन होणाऱ्या हाणामाऱ्यांमुळे कायम चर्चेत असलेल्या शहरातील जैनाबाद परिसरात रविवारी दुपारी फक्त ५०० रुपयांसाठी एका तरुणावर धारदार शस्त्राने वार करण्यात आले होते. उपचारादरम्यान त्याचा सोमवारी सकाळी मृत्यू झाला आहे. या प्रकरणी शनिपेठ पोलीस ठाण्यात संशियताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



नितीन नाना काळे (३५, रा.जैनाबाद, जळगाव) असे धारदार शस्त्राच्या हल्ल्यात मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. तो कुटुंबियांसह शहरात वास्तव्यास होता. मात्र, काही महिन्यांपूर्वी गोवा येथे कटलरीच्या दुकानात नोकरी मिळाल्याने तो तेथे काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होता. गेल्या चार दिवसांपासून सुट्टी घेऊन तो जळगावमध्ये काही कामानिमित्त आला होता. रविवारी दुपारी जैनाबाद परिसरातून तो जात असताना, त्याच वेळी संशयित श्याम तुकाराम सूर्यवंशी याने त्याला ५०० रुपये मागितले. मात्र, आपल्याजवळ आता ५०० रुपये नाहीत म्हणून नितीनने नकार दिला. याचा राग संशयित श्याम सुर्यवंशी याला आला. श्यामने रागाच्या भरात जवळच्या धारदार शस्त्राने नितीन काळे याच्यावर तीव्र हल्ला चढवला. गंभीर जखमी झालेल्या नितीनला तातडीने जळगाव शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. परंतु, उपचार सुरू असतानाच सोमवारी सकाळी सहा वाजता त्याचा मृत्यू झाला. यावेळी उपस्थित कुटुंबीयांनी रुग्णालयात आक्रोश केला. दरम्यान, जैनाबादमध्ये झालेल्या हत्येमुळे जळगाव शहर पुन्हा एकदा हादरले आहे.

**हत्येनंतर रुळावर मृतदेह फेकला**

दुसऱ्या एका घटनेत धरणगाव तालुक्यातील बांभोरी शिवारात ३५ वर्षीय तरुणाची निर्घृण हत्या करून त्याचा मृतदेह रेल्वे रुळावर फेकून दिल्याची घटना उघडकीस आली आहे. सोमवारी पहाटे दीड वाजेच्या सुमारास हा प्रकार समोर आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. या प्रकरणी पाळधी दूरक्षेत्र पोलिसांनी एका संशयिताला चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. पिंटू आमशा बारेला (रा. बरेली, जि. बडवाणी, मध्यप्रदेश) असे मृताचे नाव आहे. पिंटू त्याची पत्नी सखुबाई आणि सहकारी सुनील बारेला यांच्यासोबत बांभोरी शिवारातील रेल्वे पुलाखाली झोपडी करून राहत होता. रेल्वे रुळावर पडलेले प्लास्टिक गोळा करून तो कुटुंबाचा उदरनिर्वाह करत असे. रविवारी रात्री पिंटू आणि सुनील यांनी एकत्र मद्यप्राशन केले होते. दारूच्या नशेत दोघांमध्ये वाद झाला. दोघांमधील या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. संतापलेल्या सुनीलने पिंटूला बेदम मारहाण केली, ज्यामध्ये त्याचा मृत्यू झाला. हत्येनंतर हा अपघात वाटावा, या उद्देशाने सुनीलने पिंटूचा मृतदेह जवळच असलेल्या रेल्वे रुळावर फेकून दिला. गस्तीवरील रेल्वे पोलिसांना रुळावर पडलेला मृतदेह दिसून आला.

# महापालिकेत अधिकारी, नगरसेवकांसाठी प्रशिक्षण शाळा

## महापौर दीपमाला काळे यांची संकल्पना

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव शहर महानगरपालिकेचा कारभार अधिक लोकाभिमुख आणि प्रभावी व्हावा, या उद्देशाने महापौर दीपमाला काळे यांच्या संकल्पनेतून सर्व ७५ नगरसेवक आणि महापालिका अधिकाऱ्यांसाठी एका विशेष प्रशिक्षण वर्गाचे आयोजन मंगळवार, दि. २४ रोजी सकाळी ११ वाजता मनपाच्या सभागृहात करण्यात आले आहे. या वर्गाच्या माध्यमातून लोकप्रतिनिधींना महापालिकेच्या कामकाजाचे शास्त्रशुद्ध धडे दिले जाणार आहेत.**



महापालिकेत प्रत्यक्ष कारभार कसा करावा, प्रशासकीय रचनेत नेमके किती विभाग असतात आणि प्रत्येक विभागाची जबाबदारी काय, याबाबत या प्रशिक्षण वर्गात सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे. अनेकदा तांत्रिक माहितीच्या अभावामुळे लोकप्रतिनिधींना कामात अडचणी येतात, त्या दूर व्हाव्यात हा यामागचा मुख्य हेतू आहे. सामान्य नागरिकांचे दैनंदिन प्रश्न कोणते आहेत आणि ते प्रश्न महासभेत किंवा प्रशासनासमोर मांडताना त्यातील कायदेशीर आणि तांत्रिक बाजू कशा तपासाव्यात, याबाबतही मार्गदर्शन केले जाईल. एखादा मुद्दा अभ्यासपूर्णरीतीने मांडल्यास तो निकाली काढणे कसे सोपे होते, याचे प्रशिक्षण यावेळी दिले जाणार आहे. या प्रशिक्षण वर्गासाठी मार्गदर्शक म्हणून प्रसिद्ध वक्ते, लेखक, विश्लेषक आणि अर्थव्यवस्थेचे अभ्यासक दीपक करंजीकर उपस्थित राहणार आहेत. करंजीकर हे केवळ एक उत्तम वक्ते नसून त्यांना विविध विषयांचा सखोल व्यासंग आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे नगरसेवकांना प्रशासकीय आणि आर्थिक विषयांची मांडणी कशी करावी, याचे उत्तम ज्ञान मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. या उपक्रमामुळे जळगाव महापालिकेच्या कामकाजात अधिक स्पष्टता आणि वेग येईल, अशी अपेक्षा वर्त-वण्यात येत आहे.

## थोडक्यात

### आदिवासी उमेदवारांसाठी मोफत स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण

**जळगाव ।** अनुसूचित जमातीतील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींसाठी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र, रावेर जि.जळगाव यांच्यावतीने स्पर्धा परीक्षांच्या पूर्वतयारीसाठी मोफत प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण १ एप्रिल ते १५ जुलै या कालावधीत राबविण्यात येईल. या प्रशिक्षणामध्ये विविध शासकीय व निमशासकीय निवड समित्यांमार्फत घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षांची सखोल तयारी करून घेतली जाणार आहे. पात्र प्रशिक्षणार्थींना उपस्थितीनुसार दरमहा १०००रु. विद्यावेतन देण्यात येईल.

### साहित्य-संस्कृतीचा उत्सव आज रंगणार

**जळगाव ।** शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, जळगाव व व. वा. वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने जळगाव ग्रंथोत्सव २०२६ चे आयोजन दि. २४ व २५ मार्च रोजी करण्यात आले आहे. या दोन दिवसीय ग्रंथोत्सवात पुस्तक प्रदर्शन, विक्री तसेच विविध साहित्यिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी नागरिकांना अनुभवता येणार आहे. ग्रंथोत्सवाचे उद्घाटन दि. २४ मार्च रोजी सकाळी ११ वाजता होणार असून, कार्यक्रमाचे उद्घाटन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन तर प्रमुख अतिथी केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, ना. संजय सावकारे आदींची उपस्थिती राहील.

### व्ही.पी. होले कॉलेजमध्ये गुणगौरव समारंभ उत्साहात

**जळगाव ।** के.सी.ई. सोसायटी संचलित व्ही.पी होले कॉलेज ऑफ एज्युकेशन अँड फिजिकल एज्युकेशन (स्वायत्त) जळगाव येथे प्रतिबिंब वार्षिक स्नेहसंमेलन व गुणगौरव समारंभ उत्साहात साजरा करण्यात आला. या स्नेहसंमेलनाच्या उदघाटन प्रसंगी अध्यक्ष प्र. प्राचार्या डॉ.रंजना सोनवणे होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणुन साहित्यिक अशोक कोळी उपस्थित होते. व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व माजी प्राचार्य डॉ.अशोक राणे यांची प्रमुख उपस्थिती होती. शारीरिक शिक्षण विभागाचे विभाग प्रमुख प्रा.प्रणव बेलोरकर, अध्यापक विद्यालयाचे प्रमुख प्रा. शालिनी तायडे, विद्यार्थी प्रतिनिधी तेजस्विनी वांकावाला व्यासपीठावर उपस्थित होते. सूत्रसंचालन स्वाती पाटील व हर्षाली ताडे यांनी केले.आभार प्रा. संगीता पाटील यांनी मानले.

# बहुजन समाजाचा कलेक्टोरेटवर धडकला मोर्चा

## ओबीसींची जनगणना, युजीसी कायदा, शिक्षक पात्रता परीक्षा आदी मागण्यांचा समावेश

प्रतिनिधी । जळगाव

**ओबीसींची जनगणना, युजीसी कायदा व शिक्षक पात्रता परिक्षा या मुद्यांवर बहुजन समाजाचा जळगाव कलेक्टोरेटवर विशाल मोर्चा धडकला. विविध घोषणाबाजी करण्यात आली.त्यानंतर मोर्चाचे रुपांतर सभेत झाले.**




**उपजिल्हाधिकाऱ्यांना विविध मागण्यांचे निवेदन**

● जे.के.पाटील, एस.एल.चौधरी, विक्रम सोनवणे, जे.पी.सपकाळे, महेश पाटील, समाधान जाधव, कल्पेश चौधरी, गजानन माळी, पंडीत माळी, रविंद्र वाडे, योगेश भोईटे, नितीन पाटील, सर्वेश चौधरी, संदीप डोलारे, संभाजी अस्वार यासह विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी मोर्चात सहभागी होते. यावेळी उपजिल्हाधिकारी वैशाली चव्हाण यांना मागण्यांचे निवेदन दिले.

भारत मुक्ती मोर्चा व राष्ट्रीय पिछडा ओबीसी वर्ग मोर्चा या सामाजिक संघटनांच्या वतीने मोर्चांचे आयोजन करण्यात आले होते. जळगाव शहरातील जी.एस.ग्राऊंड येथून दि.२३ मार्च रोजी दुपारी १२ वाजता भारत मुक्ती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष देवानंद निकम व राष्ट्रीय पिछडा ओबीसी वर्ग मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सुभाष नावडे पाटील यांच्या नेतृत्वाखाली हा विशाल मोर्चा नवीन बसस्थानक मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. या मोर्चात जळगाव जिल्ह्यातील बहुजन समाजातील विविध सामाजिक, धार्मिक संघटना व राजकीय पक्ष सहभागी झाले.

केंद्र शासनाने ओबीसींची जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय कॅबिनेटमध्ये झालेला असतानाही जनगणनेच्या नोटिफिकेशनमध्ये ओबीसींच्या जातींचा स्वतंत्र कॉलमच दिलेला नाही, ही ओबीसी समाजाशी केलेली धोखेबाजी आहे. अगोदरच अशक्त असा युजीसी इक्विटी रेग्युलेशन हा कायदा केंद्राने बनवला. नंतर सर्वोच्च न्यायालयात कमजोर युक्तीवाद करुन या कायद्याला रोकणे ही सुध्दा अनु.जाती., अनु. जमाती व ओबीसी समाजाशी धोखेबाजी आहे. सन २०११ पुर्वी नियुक्त केलेल्या सर्व व्यवस्थापन व माध्यमाच्या शिक्षकांना शिक्षक पात्रता परिक्षेतुन वगळण्यात यावे आदी मागण्यांसाठी भारत मुक्ती मोर्चा व राष्ट्रीय पिछडा ओबीसी वर्ग मोर्चाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात. राजकुमार गवळे, रिंकी यादव, वसंत कोलते, डॉ. एम.व्ही.भारंबे, सतिश चौधरी, डॉ.सुभाष राणे, सुमित्र अहिरे, डी.एम.भालेराव, दिलीप जाधव, दिलीप इंगळे, देविदास पारधे, रमेश थाटे, खुमानसिंग बारेला, गफुर तडवी, अफजल तडवी, गेमा बारेला, भगवान कांबळे, संजय कदम, फारुखभाई शेख, डॉ.शाकीर शेख, गोकुळ राठोड, अभयसिंग राठोड, योगेश राठोड, नवलसिंग राठोड, पृथ्वीराज राठोड, सुभाष इंगळे, प्रा.रामभाऊ सोनवणे, आर.बी. परदेशी, रविंद्र मोरे, प्रकाश तिडके, सुनिल सोनवणे, सुभाष साळुंखे, मधुकर अहिरे, कैलास म्हसाने, रमेश थाटे, लंकापती भालेराव, ज्ञानदेव भालेराव, संदीप तायडे, भगवान सोनवणे, राजेंद्र सोनवणे, जय मोरे, संध्या तायडे, कमल ढिवरे, चारुलता पाटील, साधना लोखंडे, कविता पवार, सिंधु जाधव, प्रद्युम्न वारडे, जगदीश सपकाळे, विलास सोनवणे, सुनील देहडे आदी विविध संघटनांचे पदाधिकारी सहभागी होते.

### रामजन्म संत रचना १३ स्वर रचनाकार आज गाणार

प्रतिनिधी । जळगाव

**श्रीरामनवमी उत्सवानिमित्त दि.२४ मार्च रोजी प्रभू श्रीराम जन्म अभंग गायन सोहळा हा एक आगळा वेगळा कार्यक्रम होणार आहे. असा हा प्रयोग जळगावात प्रथमच होत असून यात १३ संगीतकार, गायक वादक सेवा देतील.**

रामपेठेतील जलग्रामदैवत श्रीराम मंदिरात मंगळवारी संध्याकाळी ७ वाजता ही गायन सेवा होईल. वारकरी संप्रदायातील थोर संत नामदेव महाराज, एकनाथ महाराज, तुकाराम महाराज, सेना महाराज, रामदास स्वामी रचित हे अभंग जळगावातील सर्वश्री ह.भ.प.श्रीराम महाराज, दुष्यंत जोशी, मकरंद देशमुख, दिलीप चौधरी, भागवत पाटील, नीळकंठ कासार, स्वरा पाठक, मनीषा पापरीकर, रेणुका जोशी, पुष्पा साकळीकर व संपदा छापेकर आदी सादर करतील. त्यांना तबल्यावर सुयोग गुरव, पखवाज श्रीधर जोशी, व्हायोलिन स्वरा पाठक,सुचेता नेवे हे साथ संगत करतील. या अभंग श्रवणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीराम मंदिर संस्थानचे विद्यमान गादीपती मंगेश महाराज जोशी यांनी केले आहे.

# श्री दादाजी दरबारात २६ रोजी कन्यापूजन



प्रतिनिधी । जळगाव

**गुढीपाडवापासून चैत्र नवरात्रोत्सवास सुरुवात झाली आहे. भुसावळ-जळगाव महामार्गावर असलेल्या खेडी येथे श्री दादाजी दरबारात चैत्र नवरात्रोत्सवानिमित्त आदिशक्ती आई भवानीची स्थापना करण्यात आली आहे. गुढीपाडवा ते रामनवमीपर्यंत नवरात्रोत्सव साजरा होत आहे. दि.२६ मार्च रोजी दरबारात कन्यापूजन व भोजन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.**

श्री दादाजी दरबारमध्ये गुढीपाडवा या शुभ मुहूर्तावर धुनिचेतन करण्यात आली आहे. जीवनातील अनेक अडचणी दूर झाल्या पाहिजे, सुख, शांती, समृद्धी जीवनात यावी म्हणून होम-हवन केले जाते. भाविकांसाठी सकाळी ८ वाजेपासून ते रात्री ११ वाजेपर्यंत होम-हवन केले जात आहे. दि.२६ मार्च रोजी अष्टमी व् नवमी तिथी एकत्र आली आहे. त्यामुळे याच रात्री ७.३० वाजता महाआरती होईल. त्यानंतर नर्मदाष्टक, रुद्राष्टक, दादाजीअष्टक, हनुमान चालीसा व् इतर स्तोत्रे होतील. स्तोत्रानंतर कन्यापूजन होऊन भोजन सुरु होईल. रात्री ९ वाजता भजनाचा कार्यक्रम रंगणार आहे. या धार्मिक व् नवरात्रोत्सवाचा लाभ भाविकांनी घ्यावा, असे आवाहन श्री केशवानंद दादाजी धुनिवाले सेवा मंडळतर्फे पी. ई. तात्या पाटील, बाजीराव पाटील व अमित चौधरी व् भक्त मंडळी यांनी केले आहे.

# बार कौन्सिलच्या निवडणुकीसाठी जळगावातून ॲड.गुलाबसिंग पाटील, ॲड.रेखा कोचुरे रिंगणात

प्रतिनिधी । जळगाव

**बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा २०२६ ची निवडणूक दि.२४ मार्च रोजी पार पडणार असून जळगाव शहरातून यंदा दोन उमेदवार मैदानात उतरले आहेत. यात ॲड. गुलाबसिंग मानसिंग पाटील आणि ॲड. रेखा घनश्याम कोचुरे हे उमेदवार निवडणूक लढवत आहेत.**

विशेष बाब म्हणजे ॲड. रेखा घनश्याम कोचुरे या जळगाव शहरातून बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाच्या निवडणुकीत उतरणाऱ्या पहिल्या महिला उमेदवार ठरल्या आहेत. यापूर्वी ॲड. एल. एल. बेंडाळे, ॲड. भरत देशमुख आदींनी प्रतिनिधित्व केले आहे. आता जळगाव न्यायालयातून पहिल्यांदा महिला उमेदवार रिंगणात उतरल्या आहेत. या निवडणुकीत एकूण २३ सदस्यांची निवड होणार असून त्यात ५ महिलांसाठी जागा राखीव आहेत. तसेच २ महिला को-ऑप्ट मेंबर्सची निवडीनंतर केली जाणार असून एकूण सदस्यसंख्या २५ असेल. जर ॲड. रेखा घनश्याम कोचुरे विजयी झाल्या तर खानदेशातून बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवावर निवडून जाणाऱ्या त्या पहिल्या महिला सदस्य ठरून इतिहास रचतील. त्यामुळे संपूर्ण वकिल समुदायाचे लक्ष या निवडणुकीकडे लागले आहे.

# रेल्वे पुलाखालील रस्ता १९ दिवस राहणार बंद

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव शहरातून विदगावमार्गे चोपडा आणि यावल तालुक्यांकडे जाणारा आणि दैनंदिन वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला ब्रिटीशकालीन रेल्वे पुलाखालील रस्ता दि. १८ मार्चपासून तात्पुरता बंद करण्यात आल्याने वाहनधारकांची मोठी तारांबळ उडाली आहे.**



जळगाव शहरातून विदगावमार्गे चोपडा आणि यावल तालुक्यांकडे जाणारा आणि दैनंदिन वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला लेंडीनालाजवळ असलेला ब्रिटीशकालीन रेल्वे पुलाखालील रस्ता १८ मार्चपासून तात्पुरता बंद करण्यात आल्याने नागरिकांची मोठी तारांबळ उडाली आहे. हा रस्ता साधारणपणे १९ दिवसांसाठी बंद राहणार असल्याने वाहनधारकांना पर्यायी मार्गाचा वापर करावा लागणार आहे. दरम्यान, हा रस्ता बंदमुळे वाहनधारकांचा वेळ आणि खर्च दोन्हीमध्ये वाढ झाली आहे.

# अचूक जनगणना हीच धोरणनिर्मितीसाठी महत्वाची बाब

## तीन दिवसीय जनगणना प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हाधिकारी रोहन घुगे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । जळगाव

**जनगणनेचा इतिहास इ.स.पूर्व ३०० वर्षांपासून असून आजही त्यामध्ये सातत्याने बदल होत आहेत. जनगणना ही केवळ लोकसंख्या मोजण्याची प्रक्रिया नसून ती धोरणात्मक निर्मितीसाठी अत्यंत महत्त्वाची बाब आहे,असे प्रतिपादन जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी केले.**




जनगणना संचालनालय, मुंबई व जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने जनगणना-२०२७ अनुषंगाने विशेष प्रशिक्षण शिबिराचे आयोजन आज नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय येथे करण्यात आले आहे. २३ ते २५ मार्चदरम्यान आयोजित या तीन दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन जिल्हाधिकारी यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी ते बोलत होते. जिल्हाधिकारी घुगे पुढे म्हणाले की, २०११ ते २०२६ या कालावधीत जनगणना प्रक्रियेत मोठे बदल झाले असून पारंपरिक कागदी पद्धतीऐवजी आता संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन करण्यात आली आहे. नागरिकांसाठी सेल्फ-एन्युमरेशनची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून अधिकाऱ्यांसाठी रिअल-टाइम मॉनिटरिंग, डॅशबोर्ड व गुणवत्ता नियंत्रणाची यंत्रणा विकसित करण्यात आली आहे. यामुळे प्रगणक व पर्यवेक्षकांचे काम वेळेत आणि अचूक पद्धतीने होत आहे की नाही, यावर प्रभावी देखरेख ठेवणे शक्य होणार आहे. तीन दिवसांच्या या प्रशिक्षणादरम्यान प्रगणक व पर्यवेक्षकांना प्रशिक्षकांमार्फत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. मार्च अखेरचा कालावधी इतर शासकीय कामकाजासाठी व्यस्त असला तरी अधिकारी-कर्मचाऱ्यांनी हे प्रशिक्षण गांभीर्याने घेऊन पूर्ण लक्षपूर्वक आत्मसात करावे, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले. ही वर्षभर चालणारी प्रक्रिया असून प्रत्येकासाठी हा वन्स इन अ लाइफटाइम अनुभव आहे. त्यामुळे याकडे जबाबदारी आणि संधी म्हणून पाहावे, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून शहीद दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. या प्रशिक्षण शिबिरात सहायक संचालक अजय ठाकूर, जणगणना संचालनालय मुंबई व या कार्यालयाचे प्रतिनिधी विशाल दिवेकर (एस. आय.जी.आर.) हे प्रमुख प्रशिक्षक म्हणून मार्गदर्शन करीत आहेत. या कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी वैशाली चव्हाण, जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आयडियल इंग्लिश अकॅडमीचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा

## ‘मोटू पटलू शो’ने वेधले विद्यार्थी-पालकांचे लक्ष

प्रतिनिधी । चोपडा

**शहरातील शरद चंद्रिका नाट्यगृहात आयडियल इंग्लिश अकॅडमी चा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी अक्षय पाटील हे उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.**




विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षा, भाषिक उपक्रम, व्याकरण परीक्षा यांची बक्षिसे व विविध पुरस्कार देण्यात आले. यात प्रामुख्याने इंग्लिश ऑलिंपियाड, स्पेलिंग बी, इंटरनॅशनल इंग्लिश ग्रामर, आयडियल स्टुडन्ट ऑफ द इयर, आयडियल सुपर स्पेलर्स, आयडियल सुपर रीडर्स, आयडियल बेस्ट बुक कीपर्स असे विविध पुरस्कार देण्यात आले. विद्यार्थ्यांनी सूत्रसंचालन केले. अकॅडमीचे संचालक पद्माकर पाटील यांनी प्रास्ताविक व अतिथी परिचय करून दिला तर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. अक्षय पाटील यांनी विद्यार्थ्यांना साधारण परिस्थितीतून ग्लोबल लेवलपर्यंत पोहोचण्यासाठी परिश्रम व भाषा यांची जोड असणे आवश्यक आहे हे नमूद केले. कार्यक्रमासाठी पालकांनी मोठी गर्दी केली होती. विद्यार्थ्यांना पारितोषिक स्वीकारताना फार आनंद झाल्याचे दिसून आले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे व आनंदाचे वातावरण होते. सर्व स्वयंसेवक, कमिटी स्टुडंट्स यांनी शिस्तप्रिय पद्धतीने कार्यक्रम आयोजित केला व पार पाडला.

‘मोटू पटलू’ची वेशभूषा असणाऱ्या कलाकारांनी विद्यार्थ्यांचे व पालकांचे मनोरंजन केले.

अकॅडमी नाविन्यपूर्ण पद्धतीने कौशल्यवान व आधुनिक विद्यार्थी घडवण्यावर जोर देत असते. संचालक पद्माकर पाटील यांचा इंग्रजी विषयाच्या कौशल्यांवर आधारित अध्यापनावर जोर असल्यामुळे अकॅडमी पालकांच्या पसंतीची बनलेली आहे.

### नांद्रे येथील पियुष मोरेचे नवोदय परीक्षेत यश

प्रतिनिधी । पाचोरा

तालुक्यातील नांद्रे येथील दिव्यांग बांधव प्रशांत मोरे यांच्या मुलाने पियुष प्रशांत मोरे याने जिद्द, चिकाटी व स्वयम अध्यायनासाठी घेतलेली मेहनत व त्याला मार्गदर्शन म्हणून लाभलेले गुरुजन यामुळे पियुष याने जवाहर नवोदय परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले. तो इयत्ता सहावीपासून सीबीएससी अभ्यासक्रमाच्या साकेगाव येथील नवोदय स्कूलसाठी पात्र ठरला आहे. या परीक्षेसाठी सर्वात अगोदर त्यांच्या आई-वडिलांनी स्वतः परिश्रम घेतले. याबरोबरच पियुष याने इयत्ता तिसरी व चौथीमध्ये मंथन परीक्षेतही जिल्हा परिषद स्कूलचे सचिन जोशी यांच्या मार्गदर्शनाने तालुक्यात प्रथम क्रमांकाने यश संपादन केले होते. याचबरोबरच नवोदय परीक्षेतही जोशी सरांचे त्याला मार्गदर्शन लाभले. त्याच्या यशाबद्दल आ. किशोर पाटील, गटविकास अधिकारी सुधाकर मुंडे, गटशिक्षणाधिकारी विजय पवार, शिक्षण विस्तार अधिकारी समाधान पाटील व सरोज गायकवाड यांनी पियुष व मार्गदर्शक जोशी सरांचे भगवान सोनार, प्रवीण सोनार, संदीप सूर्यवंशी आदींनी अभिनंदन केले आहे.

## ज्येष्ठ नागरिक संघात महिलांचा सत्कार सोहळा



प्रतिनिधी । चोपडा

**ज्येष्ठ नागरिक संघातर्फे दि.२२ मार्च रोजी महिला दिनानिमित्त महिलांचा सत्कार सोहळा पार पडला. यावेळी लोकनियुक्त नगराध्यक्षा नम्रता पाटील व नवनिर्वाचित नगरसेविकांचा सत्कार माजी नगराध्यक्ष तारा पाटील,माजी नगरसेविका राधा देशमुख, ज्येष्ठ सदस्या श्रीमती नलिनी बारोट, नलिनी देशमुख, रजनी बडगुजर यांचा सत्कार करण्यात आला. हा सत्कार रेखा बजाज. कुंदा डोंगरे, कविता देशमुख यांनी केला.**

त्यांना महिला दिनाच्या निमित्ताने स्मृतिचिन्ह, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

प्रमुख व्याख्यात्या योगिता पाटील व स्वाती बडगुजर यांनी महिलांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष जयदेव देशमुख, कोषाध्यक्ष दिलीपराव पाटील, उपाध्यक्ष नेरपगारे , सचिव विलास पाटील , विलास सु.पाटील, श्यामभाई गुजराथी, गोविंदा बापू महाजन, राजेंद्र साळुंखे, गोकुळ पाटील , पेंढारकर नाना, प्रा. एस .एम. पाटील, तात्यासाहेब रमेश शिंदे, जगन्नाथ पाटील, एन.डी. महाजन. राजन गुजराथी, रविंद्र गुजराथी, प्रमोद डोगरे, शांताराम नाना, रमेश देशमुख, आधार माळी आदी सभासद उपस्थित होते.

प्रास्ताविक जयदेव देशमुख यांनी तर सूत्रसंचालन विलास पाटील यांनी केले. प्रार्थना महाजन यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. प्रा.शामगुजराथी यांनी कार्यक्रमास सहकार्य केले.

## थोडक्यात

### यावल येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**यावल ।** येथे गजानन महाराज मंदिर हॉल विरार नगर यावल येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटातर्फे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपूर्ण बॉडी चेकअप मंगळवार दिनांक २४ मार्च २६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेदरम्यान करण्यात येणार आहे.यावेळी तज्ञ डॉक्टरची टीम तपासणीसाठी उपस्थित राहणार आहे. या शिबिराचा गरजूंनी मोठ्याप्रमाणावर फायदा घ्यावा, असे शिवसेना ठाकरे गटातर्फे कळविण्यात आले आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### गलवाडेत शेतमजूर महिलेने घेतला गळफास

**अमळनेर ।** तालुक्यातील गलवाडे बुद्रुक शिवारात ३८ वर्षीय शेतमजूर महिलेने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना २१ रोजी दुपारी उघडकीस आली आहे. मध्यप्रदेश राज्यातील बडवानी जिल्ह्यातील अनिता मांगीलाल पावरा (वय ३८) हिने २१ रोजी दुपारी चार वाजता तिने शेतातच निंबाच्या झाडाला साडीने गळफास घेतल्याचे उघडकीस आले. यावेळी महिलेला ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून तिला मृत घोषित केले.

## अमळगाव येथे पार ओट्याचे लोकार्पण



प्रतिनिधी । अमळनेर

**तालुक्यातील अमळगांव येथे पार ओट्याचे लोकार्पण आणी नवसाचा गणपती मंदिराची प्राणप्रतिष्ठा समारंभ उत्साहात पार पडला.**

अमळगांव येथील सुपुत्र तथा हल्ली पनवेलमधील लाईफ लाईन हॉस्पीटलचे संचालक असलेले डॉ. प्रकाश शिवदास भोसले पाटील व सौ. डॉ. जयश्री प्रकाश भोसले पाटील यांच्या हस्ते हा सोहळा पार पडला. त्यांच्यासोबत परभणीचे डॉ. प्रफुल्ल पाटील, डॉ. म्हस्के, इंजी. दिलीप पाटील, अशोक पाटील, पनवेल, मीनाताई पाटील, पराग बेडसे आणि त्यांचे कुटुंबीय व मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

### मुस्लीम बांधवांकडून विश्वशांतीसाठी प्रार्थना

प्रतिनिधी । चाळीसगाव

शहरातील ईदगाह मैदानावर रमजान ईदनिमित्त शनिवारी नमाज पठण करण्यात आले. यावेळी मुस्लिम बांधवांकडून आखाती देशात सुरू असलेले युद्ध थांबून, विश्व शांतीसाठी प्रार्थना करण्यात आली. ईद निमित्ताने आमदार मंगेश चव्हाण, बाजार समितीचे संचालक प्रदीप देशमुख, उपविभागीय पोलिस अधिकारी विजयकुमार ठाकूरवाड, पोलिस निरीक्षक अमितकुमार मनेळ, एपीआय प्रदिप एकशिंगे, उपनगराध्यक्ष हर्षल चौधरी, नगरसेवक अभिषेक देशमुख, दीपक पाटील, मुकेश चौधरी, राजेंद्र चौधरी, घृष्णेश्वर पाटील आदींनी मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्यात.

## हातेडला २६ मार्चपासून रामलीला महोत्सव

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील आदर्श गाव म्हणून ओळख असलेल्या हातेड बु. येथे १५० वर्षांपासून चालत आलेली श्री रामलीला महोत्सवाची गौरवशाली परंपरा यावर्षीही मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात येणार आहे.**




गावातील नागरिकांच्या सहकार्याने आयोजित करण्यात येणाऱ्या या महोत्सवात भगवान श्रीरामांच्या जीवनावर आधारित विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले जाणार आहेत. दरवर्षीप्रमाणे यंदाही भाविकांसाठी हा उत्सव श्रद्धा, भक्ती आणि संस्कृतीचा संगम ठरणार आहे. हा भव्य उत्सव दि.२६ ते ३० मार्च रोजी रात्री ८ ते १२ या कालावधीत पार पडणार आहे. परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्सवाची शोभा वाढवावी, असे आवाहन रामलीला उत्सव समिती आयोजकांकडून करण्यात येत आहे.

**संस्कृती जोपासण्याची परंपरा**

गेल्या दीडशे वर्षांची गौरवशाली परंपरा जपत गावातील समर्पित पात्रेकरू, कलाकार व ग्रामस्थांच्या सहभागातून साकार होणारा भक्ती, संस्कृती व कलेचा अद्भुत संगम पारंपरिक भूमिका वेशभूषा जिवंत नाट्य सादरीकरण करण्यात येते. रामायणातील विविध प्रसंगांचे भव्य सादरीकरण आणि गावाच्या समृद्ध संस्कृती व परंपरेचे दर्शन होते.

## गडखांब येथील महिलेचे हरविलेले पैसे मिळाले परत

प्रतिनिधी । अमळनेर

**न्हावी येथील आपल्या मुलीच्या आजारपणासाठी घेऊन जात असलेले महिलेचे पैसे हरवले होते. परंतु केंद्रप्रमुखाच्या प्रामाणिकपणामुळे परत मिळाले आहेत.**

अमळनेर तालुक्यातील गडखांब येथील कल्पना संजय पाटील ही महिला आपल्या मुलीला शिरसोली भेटण्यासाठी जळगाव बसने जात होती. तिने स्वतंत्र फायनान्स कंपनीकडून कर्ज काढून त्यातील १० हजार रुपये आपल्या मुलीच्या आजारपणासाठी घेऊन जात होती. याच बसमध्ये केंद्रप्रमुख राजेंद्र पाटील देखील होते. महिला आधीच आकाशवाणी चौकात उतरली आणि बस जळगाव स्टँडवर गेली. सर्व प्रवासी उतरले. बस आगारात जाऊन एक तास थांबली. इकडे केंद्र प्रमुख संभाजीनगर जाण्यासाठी बसची वाट पाहत होते. अमळनेरहून आलेलीच बस आगारातून बाहेर येऊन संभाजीनगर साठी लागली. त्यात अनेक प्रवाशी चढल्यानंतर देखील राजेंद्र पाटील यांना प्लास्टिक पिशवी एका सीटवर पडलेली सापडली. पिशवीत गडखांब येथील महिलेचे बँक पासबुक, पॅन कार्ड, आधार कार्ड आणि १० हजार रुपये रोख सापडले. राजेंद्र पाटील यानी महिलेचा नंबर शोधून त्यांना कळवले. महिला परत आल्यानंतर त्यांना ती रक्कम व पिशवी प्रामाणिकपणे परत करण्यात आली. त्यांनी राजेंद्र पाटील यांच्या प्रमाणिकपणाचे आभार मानले. यावेळी सी के जाधव, लीलाधर पाटील हजर होते.

## चोपडा येथील स्वामी समर्थ केंद्रात महाप्रसाद वाटप

प्रतिनिधी । चोपडा

**येथील स्वामी समर्थ केंद्रात श्री स्वामी समर्थ महाराज प्रकट दिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे भक्तिमय वातावरणात आयोजन करण्यात आले. पहाटे पाच वाजता सामुदायिक पादुका पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. भाविकांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग घेत परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले.**




यानंतर सकाळी १० वाजता स्वामी याग, महा नैवेद्य व आरतीचा कार्यक्रम पार पडला. सेवेकरी दिलीप पाटील व सौ. उर्मीला पाटील यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. यावेळी केंद्र प्रमुख आर. बी. पाटील, अशोक सनेर व गुरुदत्त निंबाळे यांनी सेवा मार्गाविषयी मार्गदर्शन करत सेवाभावाचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमास शेकडो महिला व पुरुष सेवेकरी उपस्थित होते. संपूर्ण परिसर भक्ती आणि श्रद्धेने दुमदुमून गेला होता. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. धार्मिक एकात्मता आणि सेवाभावाचा संदेश देणारा हा सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी स्वामी समर्थ भक्तगण परिसरातून दर्शनासाठी आले होते. यावेळी बऱ्याच जणांनी आपल्या गुरूंची उपासना केली.

# स्नेहसंमेलनातून देशभक्ती, संस्कृती, व्यसनमुक्तीचा प्रभावी संदेश

## मराठी शाळा टिकविण्याचा प्रभावीपणे केला निर्धार

प्रतिनिधी । पारोळा

**तालुक्यातील नांदखुर्दे खुर्द येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत संस्कृतीचा रंग महोत्सव हा वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम उत्साहात व दिमाखात पार पडला. या स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून देशभक्ती, समृद्ध संस्कृतीचे जतन, व्यसनमुक्तीचा संदेश आणि मराठी शाळा टिकविण्याचा निर्धार प्रभावीपणे मांडण्यात आला.**




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच मनीषा पाटील होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून महानंदाताई पाटील, गबाजी पाटील, जगदीश पाटील, अधिकराव पाटील, केशरलाल पाटील, वासुदेव पाटील, राजेंद्र मोरे (केंद्रप्रमुख), मधुकर पाटील, अजबराव पाटील, रमेश सपकाळे (ग्रे.मु.), सदाशिव पाटील, भागवत पाटील, अशोक पाटील, देविदास पाटील, अनिल पाटील, प्रभाकर पाटील, कैलास पवार, सुकदेव कोळवाण, अरुण पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाली. यावेळी गुढीपाडवा पट वाढवा’ या अभियानांतर्गत तयार करण्यात आलेल्या बॅनरचे उद्घाटन करण्यात आले.

### कासोदा नाक्यावर भीषण अपघात एक जागीच ठार, ट्रक चालक फरार

प्रतिनिधी । एरंडोल



**तालुक्यातील कासोदा नाक्याजवळ राष्ट्रीय महामार्गावर रविवार दि.२२ मार्च रोजी दुपारी झालेल्या भीषण अपघातात ६६ वर्षीय व्यक्तीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

मंगेश शिवदास पाटील (वय ६६, रा. पाटीलवाडा, एरंडोल) हे त्यांच्या मोटारसायकल (क्र.एम एच १९ डीक्स १०९४ वरून शेताकडे जात असताना कासोदा नाक्यासमोरील राष्ट्रीय महामार्गावर जळगावकडून धुळे दिशेने भरधाव वेगाने येणाऱ्या कंटेनर ट्रकने (क्र डीडी०१५ ९१०३ त्यांच्या मोटारसायकलला जोरदार धडक दिली. या अपघातात त्यांच्या डोक्याला व हातापायांना गंभीर दुखापत होऊन मोठ्याप्रमाणात रक्तस्त्राव झाला. ग्रामस्थांनी तत्काळ जखमी अवस्थेत मंगेश पाटील यांना खाजगी वाहनाने एरंडोल येथील कल्पना हॉस्पिटलमध्ये दाखल केले. तेथे डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले.

### धरणगावात कॉँक्रिट रस्त्याच्या कामाला सुरुवात

प्रतिनिधी । धरणगाव



**शहरातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारकापासून ते मरीमातेच्या मंदिरापर्यंत कॉँक्रिटीकरण रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली असून काही दिवसात रस्त्याचे काम पूर्णत्वास येणार आहे. मोरया परिसरातील नागरिकांची अनेक दिवसापासूनची मागणी या निमित्ताने पूर्ण होणार आहे.**

या रस्त्यामुळे बालकवी ठोंबरे शाळा, रेल्वे स्टेशन, स्वामी समर्थ केंद्र, चिंतामण मोरया मंदिर या ठिकाणी जाणारे भाविक आणि विद्यार्थी यांचे पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात हाल होत होते. या होणाऱ्या रस्त्यामुळे चिंतामण मोरया परिसरातील नागरिक खूप मोठ्या समस्येतून समस्या मुक्त होणार आहेत तसेच धरणगाव शहरातील दर गुरुवारी भरणाऱ्या आठवडे बाजारातील गर्दीमुळे एसटी महामंडळाच्या गाड्यांना गर्दीतून वाहन काढताना होणाऱ्या त्रासातून मुक्तता मिळणार आहे. कामाला प्रत्यक्षात सुरुवात झाल्यामुळे या कामाकरिता निधी उपलब्ध करून प्रयत्न करणारे जिल्ह्याचे पालकमंत्री व राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री ना. गुलाबराव पाटील आणि रस्त्याच्या कामात जातीने लक्ष घालणारे युवा नेते माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील यांचे शहरातील आणि परिसरातील नागरिकांनी आभार व्यक्त केले. अनेक दिवसांपासूनची या रस्त्याची मागणी आता पूर्णत्वास येणार आहे.